ePaper

# RTO चलन दंड भरला नाही तर वाहन जप्त करणार, PUC-RC सेवाही बंद





वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™




मोईसह धोकादायक भागांत अग्निशमन केंद्रे उभारणार कधी?

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 02 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## जखमी अवस्थेतही वाचवले १८० प्रवाशांचे प्राण

# कॅप्टन स्मिथ मच्छार 'हिरो फॉर वर्ल्ड'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दुबईहून तेल अवीवकडे जाणाऱ्या फ्लायदुबईच्या विमानात बुधवारी थरारक घटना घडली. विमान हवेत असताना सहवैमानिकाने भारतीय कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर चाकूने हल्ला केला. गंभीर जखमी होऊनही मच्छार यांनी प्रसंगावधान राखत प्रतिकार केला आणि कॉकपिटचा दरवाजा उघडण्यास मदत केली. त्यानंतर प्रवासी आणि क्रू सदस्यांनी हल्लेखोराला ताब्यात घेतले. इतर वैमानिकांच्या मदतीने विमानाचे सौदी अरेबियातील तबूक येथे सुरक्षित आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.**

या घटनेत विमानातील १७४ प्रवाशांचे प्राण वाचले. विमानाचे नियंत्रण सुटल्यानंतर त्याची उंची झपाट्याने कमी झाली होती. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन विमानाचा मार्ग तबूककडे वळवण्यात आला. लँडिंगनंतर हल्लेखोर सहवैमानिकाला सुरक्षा यंत्रणांनी ताब्यात घेतले, तर गंभीर जखमी कॅप्टन मच्छार यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मच्छार यांच्या धाडसाचे इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी कौतुक केले. जखमी अवस्थेतही त्यांनी प्रतिकार करून प्रवासी आणि क्रू सदस्यांना हल्लेखोराला ताब्यात घेण्याची संधी मिळवून दिली, असे नेतान्याहू यांनी नमूद केले. मच्छार यांना 'खरे हिरो' संबोधत त्यांच्या लवकर प्रकृतीसाठी शुभेच्छा दिल्या. या घटनेत मदत करणाऱ्या इस्रायली प्रवाशाचेही त्यांनी कौतुक केले.

कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर तबूक येथील रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती भारतीय अधिकाऱ्यांनी दिली आहे. रियाध येथील भारतीय दूतावास सौदी प्रशासन आणि मच्छार यांच्या कुटुंबीयांच्या संपर्कात आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनीही त्यांच्या धैर्याचे कौतुक केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मच्छार यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून देश त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही त्यांच्या समयसूचकतेचे आणि धैर्याचे कौतुक केले आहे.

दरम्यान, सहवैमानिकाने हल्ला का केला आणि या घटनेमागील नेमका हेतू काय होता, याचा तपास सुरू आहे. फ्लायदुबईकडूनही घटनेची चौकशी केली जात आहे.




### "मी एक सिंह पाहत आहे"

दरम्यान, स्मित मच्छार यांना विमानातील इस्रायली प्रवासी यानिव हायून यांनीही मदत केली. रक्ताळलेल्या टीशर्टमध्येच हायून यांनी बिन्यामिन नेतान्याहू यांची भेट घेतली. याबाबत बिन्यामिन नेतान्याहू म्हणाले, "मी एक सिंह पाहत आहे, मी एक मोठा हिरो पाहत आहे." पंतप्रधान नेतन्याहू यांच्या भेटीदरम्यान, हायून यांनी त्यांच्या रक्ताचे डाग असलेल्या शर्टबद्दल इस्रायली नेत्याची माफी मागितली. एका निवेदनात हायूनच्या हवाल्याने म्हटलं आहे की, "मी (माझ्या कपड्यांबद्दल) माफी मागतो, या बैठकीचा आदर राखण्यासाठी कपडे बदलता यावेत म्हणून मी १० वेळा माझी सुटकेस मागितली होती." त्यानंतर नेतन्याहू म्हणाले की त्यांना एक मोठा हिरो दिसत आहे आणि शर्टवरील रक्ताच्या डागांकडे बोट दाखवत विचारलं, "वॉव, हे रक्ताचे डाग त्यांचे (सह-वैमानिकाचे) आहेत का?", यावर प्रवाशाने उत्तर दिलं, "हे त्यांचेच आहे, होय."

### 'दुसऱ्या ९/११ ची पुनरावृत्ती टळली

यूपीएससी (UPSC) शताब्दी सोहळ्यात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कॅप्टन स्मित यांच्या शौर्याचा विशेष उल्लेख केला. "कॅप्टन स्मित मच्छार यांनी दाखवलेले धैर्य आणि संयम अभूतपूर्व आहे. इस्रायलच्या पंतप्रधानांनीही मान्य केले की, या भारतीय सुपुत्राने आणखी एका ९/११ सारख्या भीषण दुर्घटनेची पुनरावृत्ती टाळली आहे. प्रत्येक भारतीयाची मान आज स्मित यांच्या शौर्यामुळे अभिमानाने उंचावली आहे," अशा शब्दांत पंतप्रधानांनी कौतुक केले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही 'एक्स'वर (ट्विटर) पोस्ट करत कॅप्टन स्मित यांच्या समयसूचकतेचे आणि अतुलनीय धैर्याचे कौतुक केले.

### प्रवाशाने दिलेल्या माहितीनुसार

कॉकपिटमधून ओरडण्याचा आणि भांडणाचा प्रचंड आवाज येत होता. विमान हवेत गोल फिरू लागल्याने प्रवाशांमध्ये प्रचंड घबराट पसरली. परिस्थितीचे गांभीर्य पाहून तात्काळ 'विमान अपहरण' झाल्याचा इशारा देण्यात आला, ज्यामुळे विमानात मोठा गोंधळ उडाला. वैमानिकावर झालेल्या चाकूहल्ल्यामुळे विमान अचानक नियंत्रणाबाहेर जाऊन कोसळू लागल्याने हा थरारक प्रकार घडला.

# पार्थ पवार आरोपी का नाहीत?

## मुंढवा जमीन व्यवहारप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचा सवाल

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील मुंढवा येथील ४० एकर सरकारी जमीन कथितरित्या बाजारमूल्यापेक्षा कमी दरात खरेदी केल्याच्या प्रकरणात 'अलमेडा एंटरप्रायझेस एलएलपी'मध्ये ९९ टक्के हिस्सा असलेले राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे राज्यसभा खासदार पार्थ पवार यांना अद्याप आरोपी का करण्यात आलेले नाही, असा प्रश्न मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी पुन्हा एकदा उपस्थित केला. या प्रकरणात केवळ एक टक्का हिस्सा असलेल्या व्यक्तीला आरोपी करण्यात आल्याबद्दलही न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले.**





भागीदारी फर्ममध्ये ९९ टक्के हिस्सा असलेली व्यक्ती आरोपी नाही आणि केवळ एक टक्का हिस्सा असलेली व्यक्ती आरोपी हे आश्चर्यकारक आहे, अशी टिप्पणी न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपीठाने केली. पार्थ हे प्रभावशाली व्यक्ती असून विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र असल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

सुनावणीदरम्यान राज्याच्या पोलीस महासंचालकांनी प्रतिज्ञापत्राद्वारे प्रकरणाच्या पुढील तपासाबाबत माहिती दिली. तसेच, पुणे पोलिसांना या प्रकरणाचा 'सविस्तर आणि व्यावसायिक' पद्धतीने पुढील तपास करण्याचे आदेश दिल्याचे व तपासाच्या प्रगतीवर आपण स्वतः लक्ष ठेवणार असल्याचेही त्यांच्यातर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. न्यायालयाने पोलीस महासंचालकांचे हे म्हणणे स्वीकारले.

या प्रकरणात आरोपी असलेले पुणे तहसीलदार सूर्यकांत येवले यांनी केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणीच्या वेळी न्यायमूर्ती जामदार यांच्या एकलपीठाने पार्थ यांना आरोपी न करण्याबाबत पुन्हा एकदा विचारणा केली. सरकारी जमिनीच्या व्यवहारात पदाचा गैरवापर करून व्यवहारास मदत केल्याचा येवले यांच्यावर आरोप आहे. मात्र, येवले यांनी आरोपाचे खंडन करून त्यांना या प्रकरणी गोवण्यात आल्याचा दावा केला.

न्यायालयाने त्यांच्या युक्तिवादाची दखल घेतली. येवले यांनी तहसीलदार म्हणून अर्धन्यायिक अधिकारांचा वापर करून आदेश दिले होते. तथापि, मुंबई भाडेकरू कायद्यांतर्गत कोणाच्या बाजूने बेकायदा मोबदल्याच्या बदल्यात आदेश दिल्याचा त्यांच्याविरोधात कोणताही विशिष्ट आरोप नाही, असे निरीक्षण एकलपीठाने नोंदवले व याच कारणास्तव येवले यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला जात असल्याचे स्पष्ट केले.

यापूर्वी ७ सप्टेंबर रोजी न्यायालयाने पार्थ पवार यांचे नाव आरोपी म्हणून का समाविष्ट केले नाही, याचे स्पष्टीकरण देण्यासाठी पोलीस महासंचालकांना वैयक्तिक प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते.

# आचारसंहितेत नगरसेवकाच्या निधीतून चक्क दीड कोटींच्या निविदा!

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे विभागातील पदवीधर मतदारसंघ आणि शिक्षक मतदारसंघाची निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्याने महापालिकेतील अनेक कामे ठप्प झाली आहेत. आचारसंहिता लागू झाल्याने नव्याने कोणत्याही निविदा काढता येत नसताना महापालिकेच्या ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयाने नगरसेवकांच्या 'स' यादीतील कामे अत्यावश्यक असल्याचे दाखवून चक्क निविदा काढल्या आहेत.**



प्रभाग क्रमांक १३ ड, पुणे स्टेशन, जय जवाननगर परिसरातील चेंबर उचलणे, पादचारी मार्ग दुरुस्त करणे, सांडपाणी वाहिनी दुरुस्त करणे या कामांसाठी सुमारे एक कोटी ४० लाख रुपयांच्या १७ निविदा काढल्या आहेत. आचारसंहिता सुरू असल्याने ही कामे करण्यावरून प्रशासनामध्येच मतभिन्नता असल्याचे समोर आले आहे. नगरसेवकाच्या स यादीसाठी ठेवण्यात आलेल्या निधीतून निविदा काढण्याची घाई का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

गेल्या आठवड्यात पुणे विभागातील पदवीधर मतदारसंघ आणि शिक्षक मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केला. आचारसंहिता सुरू झाली. परिणामी, शहरातील अनेक कामांवर बंधने आली. आचारसंहितेमुळे महापालिकेला नवीन कामांबाबत निर्णय घेणे आणि त्याची प्रक्रिया करता येत नसल्याने अनेक खात्यांची कामे लांबणीवर गेली आहेत. नगरसेवकांच्या 'स' यादीतून केल्या जाणाऱ्या कामांनाही आचारसंहितेचा फटका बसला आहे.

महापालिकेच्या परिमंडळ एक मधील ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाने आचारसंहिता लागू झाल्यानंतर प्रभाग क्रमांक १३ डमधील 'स' यादीतील कामांसाठी निविदा काढल्या. विशेष म्हणजे यामध्ये चेंबरची दुरुस्ती, शौचालयाची दुरुस्ती, मोठ्या व्यासाची सांडपाणी वाहिनी टाकणे, पावसाळी चेंबर व पाइपची स्पायडर मशीन, जेटिंग मशीन आणि ग्रॅब मशीनद्वारे साफसफाई करणे, पादचारी मार्ग दुरुस्तीच्या कामांचा समावेश आहे.

या सर्व कामांसाठी संबंधित कंत्राटदाराकडे स्वतःची यंत्रसामग्री आणि दहा वर्षांचा अनुभव असणे आवश्यक असल्याची अटही घालण्यात आली आहे. या १७ कामांसाठी एक कोटी ४० लाख ९५ हजार ८९१ रुपये खर्च केला जाणार आहे.

महापालिकेच्या परिमंडळ १ च्या उपायुक्त आशा राऊत यांना विचारले असता, त्या म्हणाल्या, 'प्रभाग क्रमांक १३ ड मध्ये पथ आणि मलनिःसारण विभागातील देखभाल-दुरुस्तीसाठी अत्यावश्यक कामे होती. निवडणूक शाखेकडे विचारणा केल्यानंतरच ही निविदा काढण्यात आली.'

महापालिकेचे निवडणूक शाखेचे उपायुक्त प्रसाद काटकर म्हणाले, 'आचारसंहितेत देखभाल-दुरुस्तीची आणि अत्यावश्यक कामे करता येतात. मात्र, ही कामे नगरसेवकांच्या 'स' यादीतील असल्याने आचारसंहितेत ती न करता नंतर करणे योग्य ठरले असते. मुख्य खात्याच्या निधीतूनदेखील ही कामे होऊ शकतात.'

# मोईसह धोकादायक भागांत अग्निशमन केंद्रे उभारणार कधी?

## चाकण आगीच्या पार्श्वभूमीवर महेश लांडगेंचे पीएमआरडीएला पत्र

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (PMRDA) हद्दीत नागरी वसाहती, उद्योग, गोदामे आणि व्यावसायिक आस्थापनांचा वेगाने विस्तार होत असताना अग्निशमन केंद्रांची उपलब्धता आणि आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्थेचा विभागनिहाय आढावा घ्यावा. मोईसह गरज असलेल्या भागांत नवीन अग्निशमन केंद्रे किंवा उपकेंद्रे उभारावीत, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी पीएमआरडीएचे महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**



चाकण एमआयडीसीतील चिंबळी फाटा परिसरात ९ सप्टेंबर रोजी आर. आर. पॅकेजिंग कंपनीला लागलेल्या आगीचा परिणाम शेजारील कंपन्यांवरही झाला होता. आग आटोक्यात आणण्यासाठी पीएमआरडीएसह पिंपरी-चिंचवड महापालिका, आळंदी नगर परिषद आणि एमआयडीसीच्या अग्निशमन दलांना संयुक्तपणे काम करावे लागले. अग्निशमन जवानांच्या कामाचे कौतुक करतानाच वाढत्या औद्योगिक विस्तारानुसार केंद्रे, साधनसामग्री आणि यंत्रणांमधील समन्वय मजबूत करणे गरजेचे असल्याचे लांडगे यांनी पत्रात म्हटले आहे.

कुदळवाडीतील अतिक्रमणविरोधी कारवाईनंतर काही भंगार व्यावसायिक मोई व आसपासच्या भागात स्थलांतरित झाल्याचे निदर्शनास येत असल्याचा उल्लेखही त्यांनी केला आहे. त्यामुळे भंगार साठवणूक, पत्राशेड आणि लगतच्या वस्तीची प्रत्यक्ष पाहणी करून आगीचा धोका तपासावा, अशी मागणी करण्यात आली आहे. चाकण एमआयडीसीच्या हद्दीबाहेरील लहान उद्योग, कार्यशाळा आणि गोदामांसाठीही स्वतंत्र अग्निसुरक्षा नियोजन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

विद्यमान केंद्रांमधून घटनास्थळी पोहोचण्यासाठी लागणारा प्रत्यक्ष वेळ, रस्त्यांवरील अडथळे, पाण्याची उपलब्धता आणि भागनिहाय जोखीम यांचे सर्वेक्षण करावे. त्यानुसार नवीन केंद्रांसाठी जागा, निधी, प्रशिक्षित मनुष्यबळ, वाहने आणि बचाव उपकरणे निश्चित करावीत, असे लांडगे यांनी सुचवले आहे.

पीएमआरडीए, एमआयडीसी, स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस आणि आरोग्य विभागाची संयुक्त बैठक घेऊन आपत्कालीन प्रतिसाद आराखडा तयार करावा व नियमित सरावाचे नियोजन करावे. प्रस्तावित अग्निशमन केंद्रांचा कालबद्ध आराखडा आणि सर्वेक्षणाचे निष्कर्ष लेखी स्वरूपात कळवावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### आगीपूर्वीच यंत्रणा सज्ज करा!

चाकणमधील आगीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर पीएमआरडीए हद्दीतील औद्योगिक, नागरी आणि गोदाम क्षेत्रांचा अग्निसुरक्षेच्या दृष्टीने सर्वेक्षण करण्याची गरज आहे. मोईसह जोखमीच्या भागांत नवीन अग्निशमन केंद्रे उभारून मनुष्यबळ, वाहने आणि बचाव उपकरणांची पुरेशी उपलब्धता करण्याची मागणी करण्यात आली आहे.

> “अग्निशमन जवान तत्परतेने काम करत आहेत. मात्र, वाढत्या वसाहती आणि उद्योगांपर्यंत मदत वेळेत पोहोचण्यासाठी जवळची केंद्रे, पुरेशी साधनसामग्री आणि सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. मोईसह जोखीम असलेल्या भागांचे तातडीने सर्वेक्षण करून नवीन अग्निशमन केंद्रांचा कालबद्ध आराखडा निश्चित करावा. यासाठी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करणार आहोत.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

---

# उद्यमनगरच्या रस्त्याचा होणार कायापालट; विकासकामांना पुन्हा वेग!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**माजी महापौर डॉ. वैशाली घोडेकर यांच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे उद्यमनगर परिसरातील मनीष गार्डन ते रसरंग चौक या महत्त्वाच्या रस्त्याच्या विकासकामाला पुन्हा गती मिळाली आहे. पावसाळ्यामुळे काही काळ थांबलेले काम पुन्हा सुरू झाले असून, अर्बन स्ट्रीट पद्धतीने या मार्गाचा सर्वांगीण विकास करण्यात येणार आहे.**





परिसरातील नागरिकांना सुरक्षित आणि सुविधायुक्त रस्ता उपलब्ध व्हावा, यासाठी डॉ. घोडेकर यांनी पाठपुरावा केला. काही महिन्यांपूर्वी या विकासकामाचा शुभारंभ झाला होता. मात्र, पावसाळ्यामुळे प्रत्यक्ष कामात खंड पडला. आता कामाला पुन्हा सुरुवात झाल्याने या मार्गाच्या कायापालटाचा मार्ग मोकळा झाला आहे.

विकासकामांत सांडपाणी वाहिन्या, पावसाळी पाण्याचा निचरा करणारी व्यवस्था, सुंदर व सुरक्षित फूटपाथ, रस्त्याचे अद्ययावतीकरण आणि पथदिव्यांचा समावेश आहे. वाहतूक सुरळीत होण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येणार असून, नागरिक व ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची सोय आणि ओपन जिमही उभारण्यात येणार आहे.

परिसराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन ही कामे टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहेत. यामुळे पादचारी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांना अधिक सुरक्षित व सुकर प्रवासाची सुविधा मिळणार आहे.

नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी निगडित या कामाला पुन्हा सुरुवात होणे हे महत्त्वाचे पाऊल असून, आधुनिक सुविधांच्या माध्यमातून उद्यमनगरच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास डॉ. वैशाली घोडेकर यांनी व्यक्त केला.

> “उद्यमनगरातील नागरिकांना सुरक्षित रस्ता आणि आधुनिक सुविधा मिळाव्यात, यासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. मनीष गार्डन ते रसरंग चौक या मार्गाचे काम पुन्हा सुरू झाले असून, फूटपाथ, पथदिवे, पाण्याचा निचरा आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची सोय अशा सुविधांमुळे परिसराचा कायापालट होणार आहे. हे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी माझा पाठपुरावा सुरू राहील.”
>
> **- डॉ. वैशाली घोडेकर, मा. महापौर, नगरसेविका.**



## भूमिका

**महाराष्ट्रातील दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. मराठवाडा आणि विदर्भाला त्याची सर्वाधिक झळ बसत असून नदी-नाले कोरडे पडले आहेत. धरणे आणि तलावांतील पाणीसाठाही चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. पावसाची अनिश्चितता, अपुरा जलसाठा आणि सततची दुष्काळी परिस्थिती यामुळे शेतकऱ्यांसमोर पुन्हा एकदा जगण्याचा प्रश्न उभा ठाकला आहे.**

# दुष्काळाच्या दाहात शेतकरी होरपळतोय!



राज्यातील अनेक तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. पंचनामे सुरू झाले आहेत. मात्र, मदत किती मिळणार, ती कधी मिळणार आणि कोणत्या निकषांवर मिळणार, याबाबत पुरेशी स्पष्टता नसल्याने शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे. पीक कापू नका, नांगर फिरवू नका, असे प्रशासनाकडून सांगितले जाते; परंतु नुकसानग्रस्त शेतकऱ्याला प्रत्यक्ष मदत मिळेपर्यंत त्याचा संसार कसा चालणार, हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

दुष्काळाच्या काळात मंत्र्यांपासून प्रशासनापर्यंत सर्वजण शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचतात. पाहणी, पंचनामे आणि आश्वासनांचा सिलसिला सुरू होतो. मात्र, शेतकऱ्याला केवळ पाहणी नको, तर तातडीची आणि ठोस मदत हवी आहे. सरकारी दौऱ्यांवरील अनावश्यक खर्च कमी करून तो पैसा दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी वापरला, तर शासनाच्या संवेदनशीलतेचा अधिक परिणामकारक संदेश जाईल. दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी तात्पुरत्या मदतीपलीकडे जावे लागेल. जलसंधारण, सिंचन, पाणंद रस्ते, बांधबंदिस्ती, दर्जेदार बियाणे, खते आणि कीटकनाशकांची उपलब्धता यावर सातत्याने काम झाले पाहिजे. कृषी विद्यापीठांमधील संशोधन शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष उपयोगी पडेल, यासाठी अधिक प्रयत्न आवश्यक आहेत. शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देऊन शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविण्याची दिशा निश्चित करावी लागेल.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला मिळणारी मदत त्याच्या वास्तविक नुकसानीच्या तुलनेत पुरेशी आहे का, याचाही विचार करणे गरजेचे आहे. केवळ हेक्टरी मदत जाहीर करून प्रश्न सुटणार नाही. पीक कर्ज, व्याजाचा बोजा, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चित भाव यामुळे शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत आहे. त्यामुळे सुलभ आणि दीर्घमुदतीचे पीक कर्ज, वाजवी व्याजदर, वीजपुरवठा आणि शेतीमालाला योग्य भाव यांची प्रभावी व्यवस्था उभी करावी. शेतकऱ्यांसाठी जाहीर होणाऱ्या योजनांचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शेतीवर पूर्णपणे अवलंबून असलेल्या कुटुंबांना प्राधान्य देऊन योजनांची अंमलबजावणी केली, तर मदतीचा परिणाम अधिक व्यापक होईल. कर्जमाफी, पीकविमा आणि अनुदानाच्या योजनांमध्ये असलेला गोंधळ दूर करून पारदर्शकता आणणे आवश्यक आहे.

सरकारच्या प्रयत्नांना समाजाचीही साथ मिळाली पाहिजे. दुष्काळात शेतकऱ्याच्या घरातील सण-उत्सव अंधारात जाऊ नयेत, यासाठी उद्योगजगत, सामाजिक संस्था आणि सक्षम नागरिकांनी मदतीचा हात पुढे करणे गरजेचे आहे. दुष्काळ हा केवळ शेतकऱ्याचा प्रश्न नाही; तो संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेची परीक्षा आहे. म्हणूनच तात्पुरत्या मलमपट्टीऐवजी दीर्घकालीन उपाययोजना आणि तातडीची आर्थिक मदत यांचा समन्वय साधत शेतकऱ्याला पुन्हा उभे करण्याची हीच वेळ आहे.

## प्रासंगिक »

### दोन मडकी

**एका गावात जानकी नावाची वृद्ध महिला राहत होती. ती रोज विहिरीवरून दोन मडक्यांत पाणी आणायची. त्यातील एक मडके नवीन होते, तर दुसऱ्याला बारीक भेग होती. घरी पोहोचेपर्यंत भेग असलेल्या मडक्यातील अर्धे पाणी सांडायचे.**

एके दिवशी त्या मडक्याने दुःखी होऊन म्हटले, “माझ्यामुळे तुमचे कष्ट वाया जातात. माझ्याऐवजी दुसरे मडके वापरा.”

जानकी हसली आणि म्हणाली, “उद्या येताना रस्त्याच्या कडेने नीट पाह.” दुसऱ्या दिवशी मडक्याने पाहिले, त्याच्या बाजूच्या वाटेवर सुंदर फुले उमलली होती. जानकी म्हणाली, “तुझ्या भेगेतून रोज थोडे पाणी गळत होते.

तेच पाणी या फुलांना मिळत होते. मी त्या वाटेवर बियाणे पेरले होते. तुझ्या कमतरतेमुळे आज हा रस्ता फुलांनी बहरला आहे.” मडके शांत झाले. त्याला समजले की प्रत्येक उणीव निरुपयोगी नसते; योग्य ठिकाणी तिचाही उपयोग होऊ शकतो.

- तात्पर्य : स्वतःतील कमतरतांकडे निराशेने पाहू नका; योग्य प्रयत्नांनी त्यांचेही सामर्थ्यात रूपांतर करता येते.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची अर्थात एसआयआरची प्रक्रिया सुरू झाल्यापासून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत.

# फॉर्म-६ बदलला, संशयाचे ढग हटले का?




मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करण्याचा उद्देश असला, तरी पात्र मतदारांचे हक्क अबाधित राहणे ही त्याहून महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे या प्रक्रियेतील प्रत्येक निर्णय पारदर्शक आणि स्पष्ट असणे आवश्यक आहे.

नवमतदारांच्या नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म-६मध्ये एसआयआरशी संबंधित अतिरिक्त घोषणापत्र जोडण्यात आले होते. त्यात अर्जदाराच्या किंवा त्याच्या पालकांच्या मागील एसआयआरमधील नोंदीविषयी माहिती मागितली जात होती. या बदलाबाबत आयोगातीलच दोन आयुक्तांनी आक्षेप घेतल्याचे वृत्त समोर आले. त्यानंतर एसआयआर पूर्ण झालेल्या राज्यांमध्ये फॉर्म-६मधील हे अतिरिक्त घोषणापत्र हटविण्यात आले.

आयोगाचा हा निर्णय महत्त्वाचा असला, तरी त्यातून काही मूलभूत प्रश्न निर्माण होतात. वैधानिक नियमांनुसार असलेल्या फॉर्ममध्ये बदल करण्याची प्रक्रिया नेमकी काय आहे? निर्णय घेताना आयोगातील सर्व सदस्यांमध्ये पुरेशी चर्चा झाली होती का? आणि एखादा बदल नंतर मागे घ्यावा लागला, तर त्याची कारणे जनतेसमोर स्पष्टपणे मांडली जाणार आहेत का? या प्रश्नांची उत्तरे देणे संस्थेवरील विश्वासासाठी आवश्यक आहे.याहून गंभीर प्रश्न एसआयआरच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या संभाव्य परिणामांचा आहे. एखाद्या पात्र नवमतदाराला पालक किंवा पूर्वीच्या मतदार यादीशी संबंधित माहिती उपलब्ध नसल्यामुळे अडचण आली असेल, तर त्याची नोंदणी कशी सुनिश्चित केली जाणार? मतदार यादीतून नावे वगळताना आणि नव्याने नावे समाविष्ट करताना समान निकष, पुरेशी पडताळणी आणि प्रभावी अपील व्यवस्था असणे गरजेचे आहे.

निवडणूक आयोग ही लोकशाहीतील अत्यंत महत्त्वाची घटनात्मक संस्था आहे. त्यामुळे त्याच्या निर्णयांबाबत निर्माण होणाऱ्या प्रत्येक शंकेचे निरसन संवादातून झाले पाहिजे. फॉर्म-६ मूळ स्वरूपात आणणे हा एका वादाचा तात्पुरता शेवट असू शकतो; मात्र एसआयआरच्या संपूर्ण प्रक्रियेबाबत निर्माण झालेले प्रश्न त्यापलीकडे आहेत. मतदाराचा अधिकार, प्रक्रियेची पारदर्शकता आणि आयोगाची संस्थात्मक विश्वासार्हता या तिन्हींचे संरक्षण होणे, हेच या वादातून पुढे येणारे खरे आव्हान आहे.

## ।। अभंगवाणी ।।



कंठीं कृष्णमणी ।
नाहीं अशुभ ते वाणी ॥१॥

हो का नर अथवा नारी ।
रांड तयें नावें खरी ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वाल्मीक कराडचा जेलमधून फोन?

## ‘माझ्या मुलाला खून प्रकरणात अडकवण्याचा कट’; बजरंग सोनवणेंचा आरोप

**महाईन्यूज । बीड**

**विलास घुले खून प्रकरणात खासदार बजरंग सोनवणे यांच्या मुलाला जाणीवपूर्वक अडकवण्यासाठी तुरुंगातून कट रचण्यात आला असल्याचा गंभीर प्रकार खासदार बजरंग सोनवणे यांनी केला आहे. गुरुवारी खासदार बजरंग सोनवणे यांनी पत्रकार परिषद घेत कॉल रेकॉर्डिंग ऑडिओ क्लिप प्रसारमाध्यमांसमोर ऐकवली आहे.**



या ऑडिओ क्लिपमध्ये वाल्मीक कराड हा तुरुंगातून फोन करून संबंधित व्यक्तीला निर्देश देताना, “खासदार बजरंग सोनवणेच्या पोराला विलास घुले खून प्रकरणात अडकवा, त्याच्यावर गुन्हा दाखल कर... मृतदेह पोलीस ठाण्यात ठेवा, टाकीवर चढा, तुला भगवान बाबाची शपथ पण त्या गाबड्याला अडकवा,” असे बोलत असल्याचे स्पष्टपणे ऐकायला मिळत आहे. या संभाषणात समोरची व्यक्ती वारंवार “जी अण्णा, जी अण्णा” असे म्हणत असल्याचे या क्लिपमध्ये समोर आले आहे. या प्रकारामुळे बीडच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. जिल्हा कारागृहातून राजरोसपणे मोबाईलचा वापर सुरू असून यादरम्यान कट रचले जात असल्याने जेल प्रशासनाच्या कारभारावरही मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. याप्रकरणी संबंधित दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

विलास घुले खून प्रकरणात मला आणि माझ्या मुलाला जाणीवपूर्वक गोवून बदनाम करण्याचा मोठा कट रचण्यात आला होता, असा गंभीर आरोप खासदार बजरंग सोनवणे यांनी केला आहे. घुले खून प्रकरणातील पहिल्या फिर्यादीत माझ्या मुलाचे नाव अजिबात नव्हते. परंतु, मुलाचे नाव या प्रकरणात गोवण्यासाठी पूर्वनियोजित कट रचण्यात आला. यादरम्यान मृतदेह पोलीस ठाण्यात ठेवण्यात आला आणि त्यानंतर सभागृहात आमदारांनी वक्तव्य केले. हा संपूर्ण कट कसा रचला गेला, याचे सत्य आता ऑडिओ क्लिपच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समोर आणणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विलास घुले खून प्रकरणात सुरुवातीला ‘खासदारांनी मारायला सांगितल्याचा’ आरोप करण्यात आला, त्यानंतर ‘सौरव सोनवणे पोलीस स्टेशनला आल्याचे’ सांगण्यात आले आणि नंतर ‘सौरव सोनवणेने कट रचून मारल्याचा’ बनाव रचण्यात आला, असा गंभीर घटनाक्रम खासदार बजरंग सोनवणे यांनी उघड केला आहे. एवढेच नव्हे तर या प्रकरणात खात्याचा गैरवापर करत खोटी ॲट्रॉसिटी दाखल करायला लावल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

या संपूर्ण प्रकरणावरून पोलीस प्रशासनावर सवाल उपस्थित करताना खासदार सोनवणे म्हणाले, “पोलीस अधीक्षक रात्री १० वाजेपर्यंत ‘सौरव सोनवणेचा या प्रकरणात काहीही संबंध नाही’ असे म्हणतात, मग १० वाजेनंतर एस पींवर नेमके काय प्रेशर आले, की पुरवणी जबाबात नाव घेण्यात आले?” असा सवाल त्यांनी विचारला.

### गुन्हा नोंद झाला पाहिजे

“माझ्या मुलाला अडकवण्याचा कट रचला गेला आहे. मी याबाबत अधिकृत पत्र देणार असून, वाल्मीक कराड, रमेश घुले आणि सुग्रीव कराड यांच्यावर गुन्हा दाखल झालाच पाहिजे. तुरुंगातून वाल्मीक कराड आणि सुग्रीव कराड यांच्यातील कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाल्यानंतर कश्या प्रकारे सर्रास कट कसा काय रचला जाऊ शकतो? त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात केवळ कैदीच नव्हे, तर दोषी जेल प्रशासनावरही सदोष वळणाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे.” असे बजरंग सोनवणे म्हणाले.

---

## उत्सवांचा खर्च टाळा, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करा; एकनाथ शिंदे यांचे आवाहन

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आगामी नवरात्रोत्सव आणि अन्य धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम साधेपणाने साजरे करून उत्सवांवरील खर्चात बचत करावी आणि ही रक्कम दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देण्यात यावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. शिवसेना पदाधिकारी, सार्वजनिक मंडळे, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी या संकटाच्या काळात सामाजिक बांधिलकीतून पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे.**



विदर्भ, मराठवाड्यासह राज्याच्या विविध भागांत पावसाने ओढ दिल्यामुळे दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. पावसाअभावी उभी पिके करपल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर उत्सवांच्या खर्चाला काही प्रमाणात मर्यादा घालून त्यातून उपलब्ध होणारा निधी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरण्याचे आवाहन शिंदे यांनी केले.

‘राज्याच्या तिजोरीवर पहिला हक्क आमच्या बळीराजाचा आहे,’ या भूमिकेचा पुनरुच्चार करताना शिंदे यांनी सरकारकडून शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना सुरू असल्याचे सांगितले. मात्र नैसर्गिक संकटाच्या काळात केवळ शासनानेच नव्हे, तर समाजानेही पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शेतकरी संकटात असताना नवरात्रोत्सव किंवा अन्य सण मोठ्या थाटामाटात साजरे करणे योग्य ठरणार नाही, त्यामुळे सार्वजनिक मंडळांनी उत्सवांचे स्वरूप साधे ठेवावे. शिवसेनेचे पदाधिकारी, सामाजिक संस्था आणि नागरिकांनीही उत्सवांवरील अनावश्यक खर्च टाळून बचत झालेला निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना थेट मदत आणि पुनर्वसनासाठी देण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले.

शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा आणि समाजजीवनाचा महत्त्वाचा आधार आहे. अन्नदाता संकटात असताना त्याच्या मदतीला समाजातील विविध घटकांनी पुढे येणे आवश्यक असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. शासनाच्या मदतीबरोबरच सामाजिक सहभाग वाढल्यास संकटग्रस्त कुटुंबांना आधार मिळू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उत्सवावरील खर्चात बचत करून एखाद्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला आधार देता आला, त्याच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य आणता आले, तर तीच आदिशक्ती जगदंबेची खरी सेवा ठरेल, असे आवाहनही उपमुख्यमंत्र्यांनी केले.

# व्यावसायिक LPG सिलिंडर महागला!

## दसरा-दिवाळीच्या तोंडावर दरवाढीचा झटका; हॉटेल, रेस्टॉरंट्सच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दसरा दिवाळीच्या तोंडावर देशात पुन्हा एकदा सिलिंडरच्या दरांत वाढ झाली आहे. १ ऑक्टोबरपासून १९ किलोच्या व्यावसायिक एलीपीजी सिलिंडरच्या दरात ६३ रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे, आता व्यावसायिकांना मुंबईत २ हजार ७६४ रुपयांना मिळणार आहे. तर, दिल्लीत ६२.५० रुपयांनी वाढ झाल्याने सिलिंडर २ हजार ८१० रुपयांना मिळणार आहे.**



या महिन्यात दसरा आणि पुढच्या महिन्यात दिवाळीचा सण आहे. या काळात हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इतर व्यावसायिकांकडून सिलिंडरची मागणी वाढते. याच काळात तब्बल ६३ रुपयांनी वाढ झाली आहे. यापूर्वी सप्टेंबर महिन्यात व्यावसायिक सिलिंडरच्या दरात ९.५० रुपयांची वाढ झाली होती, परिणामी दिल्लीत १९ किलोचा व्यावसायिक सिलिंडर २,७४७.५० रुपयांना मिळत होता. त्यानंतर आता ही नवीन वाढ झाली आहे.

इंडियन ऑयलने दिलेल्या दरानुसार मुंबईत व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचा दर ६३ रुपयांनी वाढला असून तो २,७०१ रुपयांवरून २,७६४ रुपये झाला आहे. चेन्नईमध्ये व्यावसायिक एलपीजीची किंमत आता २,९८३ रुपये झाली आहे. उल्लेख केलेल्या शहरांपैकी पाटणामध्ये सर्वाधिक वाढ नोंदवली गेली असून, तेथे १९ किलोच्या सिलिंडरचा दर ७१.५० रुपयांनी वाढून ३,१००.५० रुपये झाला आहे. तसेच, लखनऊमध्ये सिलिंडरची किंमत ६२.५० रुपयांनी वाढून २,९३२.५० रुपये झाली आहे. या दरवाढीमुळे स्वयंपाकासाठी एलपीजी सिलिंडर वापरणाऱ्या रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि इतर व्यावसायिक प्रतिष्ठानांच्या संचालन खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे.

### घरगुती सिलिंडरचे दर स्थिर

दुसरीकडे, घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर मात्र स्थिर ठेवण्यात आले असून, यामुळे घरगुती ग्राहकांना कोणताही तात्काळ बदल किंवा दिलासा मिळालेला नाही. १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची यापूर्वीची दरवाढ सप्टेंबरमध्ये झाली होती, जेव्हा किंमत ९.५० रुपयांनी वाढवण्यात आली होती. ते सुधारित दर १ सप्टेंबरपासून लागू झाले होते आणि नवीन किंमती प्रमुख शहरांमध्ये लागू करण्यात आल्या होत्या.

# मृत्युदंडाची शिक्षा झालेली महिला २ विषारी इंजेक्शन देऊनही जिवंत

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेतील टेनेसी राज्यात मृत्युदंडाची शिक्षा झालेल्या क्रिस्टा पाइक हिला प्राणघातक इंजेक्शनचे दोन डोस देण्यात आले, मात्र त्यानंतरही तिचं हृदय धडधडत असल्याचे आढळले. त्यानंतर तिला कारागृहाबाहेरील रुग्णालयात हलवण्यात आले. तिच्या वकिलांनी शिक्षेची प्रक्रिया थांबवण्यासाठी तातडीचा अर्ज दाखल केला. टेनेसी डिपार्टमेंट ऑफ करेक्शननेही पाइकला रुग्णालयात हलवल्याची पुष्टी केली आहे.**



३० सप्टेंबरच्या रात्री नॅशव्हिलमधील 'रिव्हरबेंड मॅक्सिमम सिक्युरिटी इन्स्टिट्यूशन'मध्ये पाइकला पेंटोबार्बिटॉलचे दोन डोस देण्यात आले. तिला वकिलांनी न्यायालयात दाखल केलेल्या आपत्कालीन अर्जात पाइक बेशुद्ध झाली असली तरी तिचं हृदय धडधडत असल्याचे नमूद केले. वकिलांच्या म्हणण्यानुसार, मृत्युदंडाची प्रक्रिया अपेक्षेप्रमाणे पूर्ण न झाल्यानंतर तिला वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णालयात नेण्यात आले.

क्रिस्टा पाइकला १९९५ मध्ये १९ वर्षीय कॉलिन स्लेमर हिच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवण्यात आले होते. गुन्हा घडला तेव्हा पाइक १८ वर्षांची होती. तिच्याबरोबर असलेल्या टॅडारिल शिप याचाही या प्रकरणात सहभाग असल्याचे न्यायालयीन नोंदींमध्ये नमूद आहे. मात्र तो गुन्हा घडला तेव्हा १७ वर्षांचा असल्याने त्याला मृत्युदंडाची शिक्षा झाली नाही. पाइकला १९९६ मध्ये मृत्युदंड सुनावण्यात आला होता. त्यानंतर जवळपास तीन दशकांनी तिच्या शिक्षेची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरू झाली.

पाइकच्या वकिलांनी शिक्षा थांबवण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत न्यायालयीन लढा दिला. तिच्या बचाव पक्षाने बालपणी लैंगिक अत्याचाराला सामोरे जावे लागल्याचा इतिहास आणि इतर मानसिक आरोग्याशी संबंधित बाबी न्यायालयासमोर मांडल्या होत्या. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने मात्र शिक्षेला स्थगिती देण्याचे प्रयत्न फेटाळल्यानंतर प्रक्रिया पुढे गेली. टेनेसीचे राज्यपाल बिल ली यांनीही पाइकची दया याचिका फेटाळली होती.

मृत्युदंडाचा प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर टेनेसी सरकारने या घटनेचा सखोल आढावा घेण्याची घोषणा केली आहे. राज्यपाल बिल ली यांनी स्वतंत्र संस्थेमार्फत या घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले असून, वर्षातील उर्वरित नियोजित शिक्षा पुढे ढकलण्यात आली आहे.

दरम्यान, टेनेसी डिपार्टमेंट ऑफ करेक्शनने आपल्या कर्मचाऱ्यांनी राज्याच्या मंजूर प्रोटोकॉलनुसारच कारवाई केल्याचे म्हटले आहे. विभागाच्या म्हणण्यानुसार, वापरण्यात आलेले प्राणघातक इंजेक्शन आणि मृत्युदंडाची प्रक्रिया राज्याच्या अधिकृत नियमांनुसारच होती.

### अमेरिकेत महिला कैद्यांना मृत्युदंडाची शिक्षा दुर्मिळ

अमेरिकेत १९७६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा पुन्हा लागू केल्यापासून आतापर्यंत १८ महिलांना मृत्युदंड देण्यात आला आहेत, तर पुरुषांची संख्या दीड हजारांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे पाइकची शिक्षा ही टेनेसीमध्ये विशेष लक्षवेधी ठरली होती. आता दोन प्राणघातक इंजेक्शननंतरही पाइक जिवंत राहिल्याने तिची पुढील कायदेशीर आणि वैद्यकीय स्थिती काय असेल, याकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, या मृत्युदंडा देण्याच्या प्रयत्नात नेमकं काय चुकलं, याची स्वतंत्र चौकशी होणार आहे.



# सोनाक्षी-झहीर पुन्हा एकत्र

बॉलिवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आणि तिचा पती झहीर इक्बाल पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र झळकणार आहेत. त्यांच्या आगामी चित्रपटाची घोषणा नुकतीच करण्यात आली असून, सोनाक्षीने या चित्रपटाचे पहिले पोस्टर आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केले आहे. 'तू है मेरी किरण' असे या चित्रपटाचे नाव असून, पोस्टरने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. पोस्टरमध्ये सोनाक्षी सिन्हा लॅपटॉपवर काम करताना दिसत आहे, तर झहीर इक्बाल हातात फोन घेऊन तिच्याकडे पाहताना दिसतो. सोनाक्षीने पोस्ट शेअर करताना, "प्रेम आणि वेड यांच्यात तुम्ही रेषा कुठे आखता?" असे हटके कॅप्शन दिले आहे. या चित्रपटाच्या पोस्टरनंतर चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. 'तू है मेरी किरण' हा चित्रपट २३ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार आहे. करण रावल यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. सर्वेश गोयल, अश्वनी कुमार, मनोज दरक आणि नृपाल पटेल यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. सोनाक्षीच्या पोस्टवर चाहत्यांनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिल्या आहेत. अनेकांनी चित्रपटासाठी उत्सुक असल्याचे सांगितले असून, सोनाक्षी-झहीरची केमिस्ट्री मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहते आतुर असल्याचे कमेंट्समधून दिसून येत आहे. विशेष म्हणजे, 'तू है मेरी किरण' हे नाव शाहरुख खानच्या १९९३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'डर' चित्रपटातील लोकप्रिय गाण्यावरून प्रेरित आहे. अनेक वर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर अखेर २०२४ मध्ये सोनाक्षी आणि झहीर यांनी नात्याची कबुली देत लग्न केले.

# 'असुर 3' मध्ये संदीपा धर



वेबसीरिज 'असुर सीझन 3'मध्ये यावेळी अभिनेत्री संदीपा धर दिसून येणार आहे. संदीपाने चित्रिकरणाशी निगडित काही छायाचित्रे शेअर केली आहेत. यातील एका छायाचित्रात ती स्वत:चे डायलॉग वाचताना दिसून येत आहे. तर अन्य छायाचित्रात मेकओव्हर करवून घेताना दिसून येते. 'हे जबरदस्त असणार आहे, नवी सुरुवात आणि वादळापूर्वीची शांतता' अशी कॅप्शन संदीपाने या छायाचित्रांना दिली आहे. असुर सीझन 3 मध्ये संदीपा कोणती भूमिका साकारणार हे मात्र अद्याप स्पष्ट करण्यात आलेले नाही. संदीपासाठी असुर सीरिज मोठी संधी ठरणार आहे. ओटीटीवरील लोकप्रिय सीरिज 'असुर'च्या तिसऱ्या सीझनचे चित्रिकरण सुरू झाले आहे. सीरिजच्या मुख्य कलाकारांमध्ये अरशद वारसी आणि वरुण सोबती सामील आहेत. तर सीरिजमध्ये श्वेता बासु प्रसाद आणि अहसास चन्ना देखील मुख्य भूमिकांमध्ये दिसून येऊ शकतात. ही सीरिज पौराणिक कथा, मानसशास्त्र आणि गुन्ह्यांच्या तपासाच्या अनोख्या मिश्रणासाठी ओळखली जाते.

# 'KBC 18'च्या सेटवर अमिताभ बच्चन यांचा अपघात

अभिनेते अमिताभ बच्चन हे 'कौन बनेगा करोडपती' या लोकप्रिय कार्यक्रमाचा चेहरा आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ते या शोचे सूत्रसंचालन करत आहेत. त्यांच्या खास शैलीमुळे 'केबीसी'ला प्रेक्षकांची मोठी पसंती मिळते. मात्र, याच शोच्या शूटिंगदरम्यान अमिताभ बच्चन यांचा अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. स्वतः अमिताभ बच्चन यांनी शोमध्ये याबाबत माहिती दिली.

'कौन बनेगा करोडपती 18'च्या एका भागाच्या शूटिंगदरम्यान अमिताभ बच्चन यांचा पाय घसरला आणि ते खाली पडले. या अपघातात त्यांच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली. दुखापतीमुळे त्यांना काही काळ उभे राहणेही अवघड झाले होते. 'केबीसी'च्या प्रत्येक भागाची सुरुवात अमिताभ बच्चन यांच्या खास अंदाजात होते. ते स्टेजवर येऊन प्रेक्षक आणि स्पर्धकांचे स्वागत करतात. नेहमीप्रमाणे शूटिंग सुरू असताना त्यांचा पाय घसरला. त्यानंतर त्यांच्या गुडघ्याला दुखापत झाली.

अमिताभ बच्चन यांनी स्वतः या घटनेची माहिती कार्यक्रमातील प्रेक्षकांना दिली. त्यांनी सांगितले की, नेहमी ते मंचाच्या मध्यभागी उभे राहून प्रेक्षकांशी संवाद साधतात. मात्र, आदल्या दिवशी शूटिंगदरम्यान त्यांचा पाय घसरला आणि ते खाली पडले. त्यामुळे त्यांच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली.



अमिताभ बच्चन यांच्या दुखापतीची माहिती समोर आल्यानंतर स्टुडिओमधील प्रेक्षक आणि चाहत्यांना चिंता वाटली. मात्र, अमिताभ बच्चन यांनी स्वतः ही दुखापत गंभीर नसल्याचे स्पष्ट केले. उभे राहणे थोडे अवघड होत असले तरी ते कार्यक्रमाचे शूटिंग सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. चाहत्यांकडून मिळणाऱ्या प्रेमामुळे आपल्याला नवी ऊर्जा मिळते, असेही त्यांनी नमूद केले. दुखापतीमुळे कार्यक्रमाच्या सुरुवातीचा प्रास्ताविक भाग मात्र बसून सादर करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यामुळे नेहमीप्रमाणे स्टेजवर उभे राहून कार्यक्रमाची सुरुवात करण्याऐवजी त्यांनी बसूनच संवाद साधला.

या दुखापतीनंतरही अमिताभ बच्चन यांनी कार्यक्रमाचे शूटिंग सुरू ठेवले. त्यांनी पुढील भागात सहभागी झालेल्या स्पर्धकाचे स्वागत केले. त्यामुळे त्यांच्या व्यावसायिक बांधिलकीचीही चर्चा होत आहे. या भागात शौर्य दास हे स्पर्धक हॉटसीटवर आले होते. त्यांनी आपल्या खेळाची सुरुवात केली आणि 25 लाख रुपयांच्या प्रश्नापर्यंत यशस्वीरित्या मजल मारली. मात्र, 50 लाख रुपयांच्या प्रश्नावर ते अडचणीत आले. अमिताभ बच्चन यांनी या भागात स्पर्धकाशी नेहमीप्रमाणे संवाद साधला. दुखापत झाल्यानंतरही त्यांनी कार्यक्रमातील वातावरण हलकेफुलके ठेवण्याचा प्रयत्न केला.

अमिताभ बच्चन यांच्या अपघाताची माहिती समोर आल्यानंतर सोशल मीडियावरही चाहत्यांकडून चिंता व्यक्त केली जात आहे.

# आंतरराष्ट्रीय क्रिकेट नियमावलीत मोठे फेरबदल

## कसोटी क्रिकेटमध्ये 'स्टम्प्स'चे गणित बदलले; आता शेवटच्या चेंडूपर्यंत रंगणार थरार!

**महाईन्यूज | दुबई**

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) क्रिकेटमधील विविध प्रकारांच्या (कसोटी, एकदिवसीय आणि टी-२०) 'प्लेइंग कंडिशन्स'मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर केल्या आहेत. खेळात होणारा अनावश्यक वेळकाढूपणा रोखणे, चेंडूंचे आकारमान आणि वजन प्रमाणित करणे तसेच क्षेत्ररक्षणाशी संबंधित नियमांमध्ये अधिक पारदर्शकता आणणे, हा या सुधारणांमागील मुख्य उद्देश आहे. हे नवे नियम १ ऑक्टोबर किंवा त्यानंतर सुरू होणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय मालिकांना लागू होणार असून, सध्या सुरू असलेल्या मालिका जुन्या नियमांनुसारच खेळवल्या जातील.**



मेरिलेबोन क्रिकेट क्लबच्या (MCC) सुधारित क्रिकेट नियमावलीचा आधार घेऊन तयार करण्यात आलेली ही नवी नियमावली आयसीसीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. आयसीसीच्या पुरुष क्रिकेट समितीचे अध्यक्ष सौरव गांगुली यांनी या बदलांचे स्वागत करताना सांगितले, "खेळाचा वेग वाढवणे, क्षेत्ररक्षणाचे नियम स्पष्ट करणे आणि चेंडूंच्या मानकांसंबंधी काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. आधुनिक क्रिकेटची गरज ओळखून आणि खेळाची विश्वासार्हता व सातत्य अबाधित ठेवूनच हे बदल अमलात आणण्यात आले आहेत."

ओव्हरथ्रोबाबतची संदिग्धता दूर करण्यात आली आहे. धावा रोखण्यासाठी किंवा धावबाद करण्याच्या उद्देशाने यष्ट्यांच्या दिशेने थेट फेकलेला चेंडू म्हणजेच 'ओव्हरथ्रो' मानला जाईल. क्षेत्ररक्षकाने चेंडू अडवताना झालेली चूक (मिसफिल्ड) किंवा दुसऱ्या सहकाऱ्याकडे दिलेला चेंडू ओव्हरथ्रो समजला जाणार नाही.

सामन्यातील चेंडू अखेर 'सेटल' (खेळ तात्पुरता थांबल्याची स्थिती) कधी झाला, हे ठरवण्याचे अधिक अधिकार आता पंचांकडे असतील. चेंडू सेटल मानण्यासाठी तो गोलंदाज अथवा यष्टिरक्षकाच्या हातात असणेच अनिवार्य नाही. अटीतटीच्या सामन्यांच्या अंतिम क्षणी हा नियम अत्यंत कळीचा ठरणार आहे. खराब प्रकाशामुळे खेळाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी, दोन्ही संघांच्या परस्पर संमतीने दिवसा खेळवल्या जाणाऱ्या कसोटी सामन्यांतही गुलाबी चेंडूचा वापर करण्यास प्रायोगिक तत्त्वावर परवानगी देण्यात आली आहे. मात्र, हा निर्णय सामना सुरू होण्यापूर्वीच घ्यावा लागेल आणि संपूर्ण सामन्यात तोच चेंडू वापरावा लागेल. सामना सुरू झाल्यावर लाल चेंडू बदलून गुलाबी चेंडू वापरता येणार नाही. दिवसाच्या अखेरच्या षटकात एखादा फलंदाज बाद झाल्यास आधीप्रमाणे दिवसाचा खेळ लगेच संपणार नाही. वातावरण आणि प्रकाश योग्य असल्यास त्या षटकातील उर्वरित चेंडू त्याच दिवशी पूर्ण केले जातील. यामुळे दुसऱ्या दिवशी खेळाचा वेळ वाया जाणार नाही आणि सामन्यातील चुरस कायम राहील.

### सर्व प्रकारांसाठी लागू होणारे महत्त्वाचे बदल

फलंदाजांनी ठरवून दिलेल्या वेळेत चेंडूचा सामना करण्यासाठी तयार होणे आता बंधनकारक असेल. फलंदाजाने वेळकाढूपणा केल्यास पहिल्या चुकीवर औपचारिक इशारा, दुसऱ्यांदा अंतिम इशारा दिला जाईल. मात्र, तिसऱ्यांदा किंवा त्यानंतर प्रत्येक वेळी अशाच प्रकारचा वेळकाढूपणा आढळल्यास क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला थेट ५ पेनल्टी धावा (Penalty Runs) दिल्या जातील.
गंभीर किंवा वारंवार होणाऱ्या उल्लंघनावर आयसीसीच्या आचारसंहितेनुसार (Code of Conduct) कारवाई होऊ शकते. आतापर्यंत उत्पादकांकडून महिला व कनिष्ठ (ज्युनिअर) क्रिकेटसाठी अनेकदा एकाच प्रकारचा चेंडू वापरला जात असे.

# कर्णधार म्हणून श्रेयस अय्यरने एम.एस. धोनीला मागे टाकले; सर्वाधिक विजयाची नोंद

**महाईन्यूज | मुंबई**

**आशियाई क्रीडा स्पर्धेत आज उपांत्य सामन्यात श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने श्रीलंकेवर १२४ धावांनी दणदणीत विजय मिळवला. निशिन (Nishin) येथील मैदानावर भारताने प्रथम फलंदाजी करताना १६९/७ धावा केल्या आणि त्यानंतर श्रीलंकेचा डाव अवघ्या ४५ धावांत (९.५ षटकांत) गुंडाळला. श्रीलंकेचे नऊ खेळाडू दुहेरी धावसंख्या गाठू शकले नाहीत.**




त्यापैकी पाच खेळाडूंना खातेही उघडता आले नाही. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताच्या विरोधात कोणत्याही संघाने नोंदवलेली ही सर्वात कमी धावसंख्या ठरली. तसेच, धावांच्या फरकाने भारताचा हा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सातवा सर्वात मोठा विजय होता.

श्रीलंकेविरुद्धच्या उपांत्य सामन्यात इशान किशन आणि वैभव सूर्यवंशी यांनी उत्कृष्ट फलंदाजी केली. इशानने चार चौकार आणि पाच षटकार फटकातव ४६ चेंडूंत ८० धावा केल्या. सूर्यवंशीने २१ चेंडूंत ३८ धावा केल्या. कर्णधार अय्यर (७) यांच्यासह चार खेळाडू एकेरी धावसंख्येवर बाद झाले. प्रत्युत्तरात, श्रीलंकेने पॉवरप्लेमध्येच ३१ धावांत सहा विकेट्स गमावल्या. जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल आणि अभिषेक शर्मा यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या, तर वॉशिंग्टन सुंदरने एक विकेट घेतली. श्रीलंकेचे तीन खेळाडू धावबाद (रन-आउट) झाले. आता शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी भारत आणि पाकिस्तानमध्ये सुवर्णपदकासाठीचा सामना होणार आहे.

या विजयामुळे भारतीय संघाने स्पर्धेच्या अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला असून सुवर्णपदकाच्या आशा अधिक बळकट झाल्या आहेत. फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर भारतीय खेळाडूंनी सातत्यपूर्ण कामगिरी करत संघाचे वर्चस्व सिद्ध केले. इशान किशन आणि वैभव सूर्यवंशी यांच्या आक्रमक फलंदाजीने श्रीलंकेच्या गोलंदाजांवर दबाव निर्माण केला. त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत श्रीलंकेच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले.

### अय्यरने एम.एस. धोनीला मागे टाकले

सर्वाधिक सलग टी-२० आंतरराष्ट्रीय विजय मिळवणाऱ्या भारतीय कर्णधारांच्या यादीत श्रेयस अय्यरने एम.एस. धोनीला मागे टाकले आहे. अय्यरने आता सलग आठ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने जिंकले आहेत. यापूर्वी धोनीने २०१२-१४ आणि २०१६ मध्ये सलग सात सामने जिंकण्याचा पराक्रम केला होता. आता या यादीत अय्यरची नजर सूर्यकुमार यादव आणि विराट कोहली यांच्या विक्रमांवर आहे. सूर्यकुमारने २०२३-२४ मध्ये सलग आठ आणि २०२५ मध्ये सलग नऊ सामने जिंकले होते; मात्र, २०२६ च्या टी-२० विश्वचषकानंतर त्याला केवळ कर्णधारपदावरूनच नाही, तर भारतीय टी-२० संघातूनही वगळण्यात आले होते. विराट कोहलीनेही २०१९-२० च्या काळात कर्णधार असताना सलग विजय मिळवण्याची मालिका साधली होती.


D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
SHAPE YOUR FUTURE.
LEAD WITH JUSTICE.
B.A. LL.B. (Hons.)
&
B.B.A. LL.B. (Hons.)
INTEGRATED 5 YEAR PROGRAMS
Build a Strong Foundation in Law.
Make an Impact.
Create Change.
ADMISSION OPEN 2026
School of Legal Studies
Experienced Faculty
Moot Court & Practical Training
Global Exposure & Collaborations
Legal Aid Support
APPROVED BY BAR COUNCIL OF INDIA
+91-8600091180
admission@dypiu.ac.in
www.dypiu.ac.in
Apply Now

# अंगणवाडी सेविका भावी पिढीच्या घडणीचा कणा

## पिंपळे सौदागरमध्ये 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत सेविकांचा गौरव; भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचे मत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**"बालकांचे आरोग्य, शिक्षण आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी अंगणवाडी सेविका अविरत सेवा बजावतात. त्या समाजसेवेचा आणि भावी पिढीच्या घडणीचा खरा कणा आहेत. त्यांच्या पाठीशी भारतीय जनता पार्टी सदैव खंबीरपणे उभी राहील," असे प्रतिपादन भाजपचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी केले.**





पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत पिंपळे सौदागर येथील अंगणवाडी शाळेत सेविकांचा विशेष सन्मान समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या काटे यांच्या हस्ते अंगणवाडी सेविकांचा गौरव करण्यात आला.

बालकांवर उत्तम संस्कार घडविणे, कुपोषणमुक्तीसाठी प्रयत्न करणे आणि तळागाळातील बालके व मातांपर्यंत आरोग्य व शिक्षणाच्या सुविधा पोहोचविण्यात अंगणवाडी सेविकांचे मोलाचे योगदान असल्याचे काटे यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी यांच्या 'सेवा, सुशासन आणि जनकल्याण' या ध्येयाला अनुसरून सेविकांच्या कार्याची दखल घेणे महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

"लहान मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्यापासून महिलांच्या सक्षमीकरणापर्यंत अंगणवाडी सेविकांचे कार्य विस्तारलेले आहे. पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त अशा 'राष्ट्रसेविकां'चा गौरव करताना आम्हा सर्वांना मनस्वी आनंद होत आहे," अशा भावना काटे यांनी व्यक्त केल्या.

> अंगणवाडी सेविका या बालकांच्या आरोग्याचा, शिक्षणाचा आणि भावी पिढीच्या घडणीचा भक्कम आधार आहेत. कुपोषणमुक्तीपासून महिलांच्या सक्षमीकरणापर्यंत त्यांचे योगदान मोलाचे आहे. 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत त्यांचा गौरव करणे हा त्यांच्या निःस्वार्थ सेवेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न आहे. भारतीय जनता पार्टी त्यांच्या पाठीशी सदैव खंबीरपणे उभी राहील.
>
> **- शत्रुघ्न (बापू) काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

कार्यक्रमास नगरसेविका अनिता काटे, कुंदा भिसे, अर्चना तापकीर, मंडल अध्यक्ष सोमनाथ तापकीर, संदेश काटे पाटील, संदीप काटे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# सेवा रस्त्याच्या दुरुस्तीसाठी डॉ. सुहास कांबळे यांचा पुढाकार; नागरिकांच्या तक्रारीची तातडीने दखल

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**प्रभाग क्रमांक ८ मधील पुणे-नाशिक महामार्गालगत राजा शिवछत्रपती चौक ते केंद्रीय विहार चौकापर्यंतच्या सेवा रस्त्याच्या दुरवस्थेबाबत नागरिकांकडून करण्यात आलेल्या मागणीची नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी तातडीने दखल घेतली आहे. त्यांनी नुकतीच संबंधित सेवा रस्त्याची समक्ष पाहणी करून नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या.**



या सेवा रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून, स्ट्रॉम वॉटर लाइन, ड्रेनेज लाइन तसेच महावितरण केबलसाठी करण्यात आलेले खोदकाम व्यवस्थित बुजविण्यात आलेले नाही. काही ठिकाणी चेंबरची झाकणे रस्त्याच्या पातळीपेक्षा उंच झाली आहेत. पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचत असल्याने वाहनचालक, विद्यार्थी आणि पादचाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर डॉ. सुहास कांबळे यांनी महापालिका अभियंत्यांना निवेदन देत रस्त्यावरील खड्डे बुजविणे, खोदलेले चर व्यवस्थित बुजविणे, चेंबरची झाकणे रस्त्याच्या पातळीवर आणणे आणि आवश्यक त्या ठिकाणी डांबरीकरण करण्याची मागणी केली. यावेळी उपस्थित नागरिकांनी परिसरातील इतर आवश्यक कामांकडेही डॉ. कांबळे यांचे लक्ष वेधले. नागरिकांनी सुचविलेली कामे मार्गी लावण्यासाठी सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन उपस्थितांना देण्यात आले.

नागरिकांच्या तक्रारीवर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून पाहणी आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आल्याने या सेवा रस्त्याच्या प्रश्नाला आता गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

> "नागरिकांची सुरक्षितता ही सर्वांत महत्त्वाची आहे. दररोज मोठ्या संख्येने नागरिक आणि वाहनचालक या सेवा रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे रस्त्याची दुरवस्था, खड्डे आणि पावसाळ्यात होणारे पाणी साचणे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. नागरिकांनी निदर्शनास आणून दिलेल्या समस्या प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. रस्त्याची आवश्यक ती दुरुस्ती आणि डांबरीकरणाची कामे तातडीने मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला जाईल. नागरिकांना सुरक्षित आणि सुकर वाहतूक सुविधा मिळणे ही आपली प्राथमिकता आहे."
>
> **- डॉ. सुहास कांबळे,** नगरसेवक पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.



# एमआयटी महाविद्यालयात ग्रंथालय व एनएसएस सप्ताह

## 'वाचनातून जीवनाचा शोध' संकल्पनेवर ग्रंथालय सप्ताह व राष्ट्रीय सेवा योजना सप्ताह

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने "वाचनातून जीवनाचा शोध" या संकल्पनेवर आधारित ग्रंथालय सप्ताह व राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाचे आयोजन २८ ते २९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयाविषयी आपुलकी निर्माण करणे, चांगल्या वाचनसवयी रुजवणे आणि वाचनकौशल्य अधिक बळकट करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.**




कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे, डॉ. अक्षदा कुलकर्णी आणि प्रमुख पाहुणे सरस्वती रात्र महाविद्यालय, पुणे येथील ग्रंथपाल श्री. राजेश अगव्हाणे यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी बोलताना संचालक डॉ. बी. बी. वाफारे म्हणाले, "वाचन हे केवळ ज्ञान मिळवण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे. डिजिटल युगातही पुस्तकांशी असलेले नाते टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे. ग्रंथालय सप्ताह यासारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय आयुष्यभर जोपासावी."

प्रमुख पाहुणे श्री. राजेश अगव्हाणे यांनी आपल्या मनोगतात सांगितले, "ग्रंथालय हे महाविद्यालयाचे हृदय असते. साहित्य आपल्याला समाजाकडे संवेदनशीलतेने पाहायला शिकवते. वाचनातून मिळणारी विचारशक्ती आणि संस्कार हेच विद्यार्थ्यांच्या यशाचे खरे भांडवल आहे. तरुणांनी दररोज किमान काही वेळ पुस्तकवाचनासाठी द्यावा."

सप्ताहानिमित्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. रील मेकिंग स्पर्धेत कॅम्पस जीवन व विद्यार्थी अनुभव, कौशल्य व कलागुण सादरीकरण, तसेच मानसिक आरोग्य, पर्यावरणपूरक सवयी, डिजिटल डिटॉक्स, लैंगिक समानता व रस्ता सुरक्षा यांसारख्या सामाजिक जनजागृतीच्या विषयांचा समावेश होता. पुस्तक परीक्षण स्पर्धेत "महाविद्यालयीन जीवनात मला मार्गदर्शक ठरलेले पुस्तक", नेतृत्व व उद्योजकता, करिअर व प्रेरणा, मानसिक आरोग्य, साहित्यातील सामाजिक प्रश्न तसेच "कोणतेही पुस्तक, तुमचा दृष्टिकोन" असे विषय देण्यात आले होते. "साहित्य रंगमंच" उपक्रमात विद्यार्थ्यांनी सामाजिक विषय, राष्ट्रभक्ती, ग्रामीण विरुद्ध शहरी जीवन, नैतिकता व संस्कृती, युवा व स्वप्ने आणि परिवर्तन या विषयांवर प्रभावी सादरीकरणे केली. याशिवाय काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली. या सर्व स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील १२८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

सामाजिक व वाचनविषयक जाणीव समाजापर्यंत पोहोचावी यासाठी ज्ञानेश्वर विद्यालय, श्री लक्ष्मीबाई दुराफे विद्यालय व राजे शिवछत्रपती विद्यालय येथे विस्तार उपक्रम राबविण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांसाठी वाचन शर्यत (रीडिंग रेस), पोस्टर मेकिंग स्पर्धा आणि पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. पथनाट्याच्या माध्यमातून व्यसनाधीनतेपासून मुक्तीकडे जाणारा युवकाचा प्रवास, समवयस्कांच्या दबावामुळे होणारी व्यसनाची सुरुवात, व्यसनामुळे उद्ध्वस्त होणारी कुटुंबे, तंबाखू-मद्य यांसारख्या लहान व्यसनांतून मोठ्या व्यसनांकडे होणारी वाटचाल आणि समुपदेशन व पुनर्वसन केंद्रांची भूमिका यावर प्रबोधन करण्यात आले. या उपक्रमांत ४८३ शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथालय विभागाचे प्रमुख डॉ. राहुल बाराथे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख प्रा. अरविंद वागस्कर, ग्रंथालय विभागातील सारिका पडवळ, आदर्श तांबे, सुवर्णा सानप तसेच विद्यार्थी स्वयंसेवक कुणाल तावरे, नम्रता गव्हाणे, सिद्धी रेड्डी, ब्रीद पुनिया, शुभम खुडे, नित्य पुंडे, कीर्ती पठाडे, रोहन धने व श्रुती परब यांनी परिश्रम घेतले.

# दिवेआगर दुर्घटना! आळंदीतील ८ विद्यार्थ्यांचा मृत्यू; कुटुंबीयांना तातडीने मदत देण्याचे निर्देश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर पुण्यातील आळंदी येथील आठ विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाल्याच्या हृदयद्रावक घटनेची राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी गंभीर दखल घेतली आहे.**



या दुर्घटनेबाबत दुःख व्यक्त करत मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना तातडीने सर्वतोपरी प्रशासकीय व आवश्यक मदत पुरवण्याचे कडक निर्देश संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

घटनेची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, रायगडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किशन नारायणराव जावळे आणि रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्याशी थेट दूरध्वनीवरून संपर्क साधला. त्यांनी घटनास्थळावरील सद्यस्थितीचा आढावा घेत बचाव व मदतकार्याची सविस्तर माहिती घेतली. तसेच दोन्ही जिल्ह्यांच्या प्रशासनाने परस्पर समन्वय ठेवून मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी आणि पुढील कायदेशीर व वैद्यकीय सोपस्कार युद्धपातळीवर पूर्ण करावेत, अशा स्पष्ट सूचना दिल्या.

आळंदी परिसरातील खासगी अकॅडमीच्या इयत्ता ११ वी आणि १२ वी सायन्सच्या सुमारे ३० ते ४० विद्यार्थ्यांची सहल दिवेआगर येथे आली होती. समुद्रकिनाऱ्यावर आनंद घेत असताना काही मुले पाण्यात उतरली. मात्र, समुद्रातील पाण्याचा वेग आणि खोलीचा अंदाज न आल्यामुळे आठ विद्यार्थी पाण्याच्या जोरदार प्रवाहात खोलवर वाहून गेले. स्थानिक प्रशासन, पोलीस, महसूल, आरोग्य यंत्रणा आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने तातडीने शोधमोहीम राबवून आठही जणांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आले.

### प्रशासकीय यंत्रणा हायअलर्टवर

घटनेनंतर पुणे व रायगड जिल्हा प्रशासनामध्ये समन्वय साधण्यात येत आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. तर रायगडचे जिल्हाधिकारी किशन नारायणराव जावळे आणि पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक महसूल व पोलीस दल घटनास्थळी ठाण मांडून असून, मृतदेहांचे शवविच्छेदन व इतर कायदेशीर प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे काम सुरू आहे. ऐन तारुण्यात आठ विद्यार्थ्यांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने संपूर्ण आळंदी आणि पुणे शहरावर शोककळा पसरली आहे.


Are You
STRUGGLING
With :
Knee Pain
Knee Swelling
Knee Stiffness
Decrease In
Knee Mobility
It can be a sign of infection, consult
our experts now!
020-67313000 / +91 98220 55986
Sainath Hospital, Sant Nagar, Sector no. 4,
Moshi Pradhikaran, Pune - Nashik Highway,
Pune 412105
SAINATH HOSPITAL
Assuring Quality Care
Center Of Excellence For Trauma & Joint Replacement Surgery
www.sainathhospital.com